3

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** अक्कलकोट उत्तर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0110 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/03/2024 20:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 05/03/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Time From (वेळेपासून):** 12:14 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:44 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/03/2024 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 038

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/03/2024 20:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नविन राजवाडा अक्कलकोट , अक्कलकोट

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विक्रम तारासिंग राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डीगेवाडी तांडा,अक्कलकोट,अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | डीगेवाडी तांडा,अक्कलकोट,अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9921629226

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दादासाहेब श्रीकांत बोडके | | | 1. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, अक्कलकोट उत्तर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि:- 05/03/2024

मी विक्रम तारासिंग राठोड, वय 30 वर्षे, व्यवसाय- ड्रायव्हर, रा. मु. डीग्गेवाडी तांडा, पोस्ट कडबगांव , ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. (शिक्षण - बी ए ) मो.नं. 9921629226 समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की, मी दि. 04/03/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक, श्री उमाकांत महाडिक यांचेशी संपर्क साधुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 05/03/2024 रोजी सोलापूर - अक्कलकोट रोडवरील अक्कलकोट गावापासुन अंदाजे 01 कि.मी अंतरावर असलेल्या जीओ पेट्रोलपंप जवळ येवुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी येवुन थांबलो असता तेथे काहीवेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने आले. तेथे पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,

मी मागील 05 महीन्यांपुर्वी माझ्या ओळखीचे मल्लु पुजारी यांचेकडुन रिअलमी 5 आय मोबाईल 4,000/- रुपयांना विकत घेतला असुन सदरचा मोबाईल चोरीचा असल्याचे सांगुन माझ्या विरुध्द पोलीस ठाणे येथे मोबाईल चोरीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथील पोलीस अंमलदार बोडके हे 5,000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन पोलीस अंमलदार श्री बोडके यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली. व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहीत मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. पोलीस अंमलदार बोडके यांनी मला अक्कलकोट येथे आल्यानंतर फोन करण्यास सांगीतले असल्याने मी पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन माझ्या मोबाईलवरुन बोडके यांचे मोबाईलवर फोन करुन स्पीकर फोन ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये मी त्यांना अक्कलकोट येथील स्वामी समर्थ हॉस्पिटलच्या शेजारी असलेले पेट्रोलपंप येथे असल्याबाबत सांगीतले. त्यावर बोडके यांनी मला थांब तेथेच आलोच असे सांगुन फोन कट केला. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले.

त्यानंतर पोलीस अंमलदार बोडके यांच्यावर पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्या मोटारसायकलवरुन अक्कलकोट येथील स्वामी समर्थ हॉस्पिटलच्या शेजारी असलेले पेट्रोलपंप येथे पाठविले. त्याप्रमाणे आम्ही पेट्रोलपंप जवळ गेलो असता तेथे रस्त्याच्या दुस-या बाजुस असलेल्या पंचायत समिती अक्कलकोटच्या बाहेर बोडके थांबलेले होते. त्यांनी मला हात करुन त्यांचेकडे येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी व पंच असे बोडके थांबलेल्या ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी बोडके यांनी पंच यांचेकडे हात करुन ही कोण आहे असे विचारले त्यावर मी त्यांना भाचा असल्याचे सांगीतले. व माझ्याकडे असलेला रीअलमीचा मोबाईल व पासवर्ड त्यांना दिला. त्यानंतर बोडके यांनी मला त्यांचे मोटार सायकलवर बसण्यास सांगुन पंच 01 यांना तेथेच सोडुन पोलीस ठाणेचे दिशेने घेवुन गेले व मोटार सायकलवर जातेवेळीच माझ्याकडे 5,000/- रुपयांची मागणी केली. त्यावर मी तडजोड करण्याचा प्रयत्न केला परंतु बोडके यांनी त्यास नकार दिला. त्यावर मी माझ्या डीग्गेवाडी येथे असलेल्या घरातुन घेवुन येतो असे सांगीतल्यावर मला पंच 01 थांबलेल्या ठिकाणी परत घेवुन आले. व सदर ठिकाणी माझ्याकडुन माझा दुसरा मोबाईल देखील काढुन घेतला व पंच 01 यांना तेथेच थांबवुन घेवुन मला एकटयाला जावुन पैसे घेवुन येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली. त्यानंतर पोलीस अंमलदार बोडके यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सर्व सापळापुर्व कार्यवाही पुर्ण केली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी पोलीस अंमलदार बोडके यांचेवर सापळा

कारवाई करीता आवश्यक 5,000/- रुपयांची मागणी केली परंतु माझ्याकडे फक्त 3,500/- रुपये असल्याबाबत मी पोनि महाडिक यांना सांगीतले असता पोनि महाडिक यांनी उर्वरीत 1,500/- हे खेळण्यातले नोटा वापरण्याचे ठरविले. त्याअनुषंगाने मी हजर केलेली लाच रक्कम 3,500/- रुपयांच्या नोटांना तसेच 1500/- रुपयांच्या खेळण्यातील नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन त्याची घडी करुन माझ्या नेसते पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, पंच - 02 व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या - त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस अंमलदार बोडके यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळ्यात अडकवून मला माझ्या मोटार सायकलवरुन पंचायत समिती अक्कलकोटच्या बाहेर रस्त्यावर बोडके यांची भेट घेण्याकरीता पाठविले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी पंचायत समिती अक्कलकोट येथे गेलो असता सदर ठिकाणी बाहेर रस्त्यावर पोलीस अंमलदार बोडके व पंच 01 थांबलेले होते. तेथे बोडके हे माझ्या मोटार सायकलवर माझ्या पाठीमागे बसुन चल येथुन जावुन येवु असे म्हणुन पंचायत समिती अक्कलकोट येथुन छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नविन राजवाडाकडे जाणा-या रस्त्यावर काही अंतरावर असलेल्या शरबतच्या गाडयावर घेवुन गेले. आमचे पाठीमागे पोनि महाडिक पंच 02 व सापळा पथक असे येवुन सदर परीसरात सापळा लावुन थांबले.

सदर ठिकाणी बोडके यांनी बर काढ चल लवकर असे म्हणुन माझ्याकडे पैश्याची मागणी केली त्यावर मी त्यांना माझे नेसते पॅन्टच्या उजव्या खिशातील लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली सदरची रक्कम बोडके यांनी त्यांचे डावे हाताने स्विकारुन त्यांचे नेसते जीन्स पॅन्टच्या डावे बाजुच्या खिशामध्ये ठेवली त्यावर मी त्यांना पुर्ण 5,000/- तुम्ही सांगीतल्यासारख असे म्हणुन मी मोबाईल चोरी केला नाही, तुम्ही मला कश्यात तर अडकवचाल असे म्हणालो असता बोडके यांनी एकदा सांगीतलं की, सांगीतलं असे म्हणाले व सदर ठिकाणी त्यांचे मोबाईलमध्ये माझा रिअलमी मोबाईलसह फोटो काढला.

त्यानंतर आम्ही दोघे पुन्हा पंचायत समिती अक्कलकोट येथे आलो पोनि महाडिक व सापळा पथक हे देखील शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ निघाले. मी बोडके यांना पंचायत समिती अक्कलकोट समोर सोडले त्यानंतर बोडके हे माझ्याशी बोलुन तेथुन निघुन जात असतेवेळी मी पोनि महाडिक, व सापळा पथकास दिसेल असा लाच स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन पोलीस अंमलदार बोडके यांना पकडले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी पोलीस अंमलदार बोडके यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दादासाहेब श्रीकांत बोडके, वय 33 वर्षे, पद – पोशि / 1152, सध्या नेम. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, रा. रुम नं. 44, जुनी पोलीस लाईन, डीव्हाएसपी कार्यालयाचे पाठीमागे, अक्कलकोट, जि. सोलापूर असे असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी वाहनामध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालय येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 05/03/2024 रोजीचे 12.14 ते 13.44 वा. च्या दरम्यान आरोपी लोकसेवक दादासाहेब श्रीकांत बोडके, वय 32 वर्षे, पद – पोशि / 1152, सध्या नेम. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरूपयोग करून मी वापरत असलेला मोबाईल चोरीचा असल्याचे सांगुन माझ्याविरुध्द पोलीस ठाणे येथे चोरीचा गुन्हा दाखल न करण्याकरीता पंचायत समिती अक्कलकोटच्या समोर रस्त्यावर 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नविन राजवाडाकडे जाणा-या रस्त्यावर काही अंतरावर असलेल्या शरबतच्या गाडयासमोर स्वीकारली आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक दादासाहेब श्रीकांत बोडके, वय 32 वर्षे, पद – पोशि / 1152, सध्या नेम. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंन्ट काढल्यानंतर मी वाचुन पाहीला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
snehal vilas chavan
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402SVC
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** JITENDRA VASANTRA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPJVKM7101